**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य पुणे ४११००१**

Web : www.dhepune.gov E-mail : budget.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६१२२१११, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६११११५३


क्र. अर्थस-२०१५(०९४/१५) लेखा -२ 296 दि.७ जानेवारी २०१६

प्रति,

शिक्षण संचालननालय, (उच्च शिक्षण), यांच्या अधिनस्त् असलेली,
सर्व शासकीय महाविद्यालये, सर्व संस्था,सर्व विभागीय कार्यालये, सर्व वसतिगृहे

विषय - खरेदीचे प्रस्ताव विहित वेळेत सादर करणेबाबत

सदंर्भ - १. उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्. क्र ८२/ भाग -३ उद्योग -४ दि. ३० ऑक्टोबर २०१५
२. संचालनालयाचे पत्र . क्र. अर्थस-२०१५(१७२/१५) लेखा -२ दि.०८ डिसेबर २०१५
३. शासन पत्र क्. पशामा २०१५/ (१३७/१५)/ मशि ३ दि ०२ जानेवारी २०१६

उपरोक्त् विषयाबाबत संचालनालयाचे संदर्भ पत्र क्र २ चे पत्र अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र. क्र ८२/ भाग -३ उद्योग -४ दि.३० ऑक्टोबर २०१५ या शासन निर्णयासोबतच्या नियमपुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनूसार कार्यालयीन खरेदी करण्याबाबत सर्व संस्था , महाविद्यालये तसेच कार्यालयाना कळविण्यात आलेले आहे. याबाबत आपणास खालील पुन:श्च् सुचना देण्यात येत आहेत.

१. दि. ३० ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयामधील क्र.११. वित्त् विभागाकडून कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रकमा **१५ मार्च नंतर** मंजूर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार कार्यालयाने आवश्यक त्या वस्तूची खरेदी वित्तीय वर्षाच्या १५ फेबूवारीपूर्वीच होईल. अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी. असे निर्बध घातलेले असल्याने या नियमाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे

२. कोषागारात विहित वेळेत देयके सादर करून पारित करुन घ्यावीत. यामध्ये तरतुद व्यपगत होणार नाही. याची दक्षता घ्यावी. तरतुद खर्च होणार नसेल तर सदरची तरतूद **दि.३१ जानेवारी २०१६ पर्यत** समर्पित करण्यात यावी. तरतुद खर्ची न पडल्यास याबाबतची जबाबदारी आपल्या कार्यालयावर राहील. जेणे करुन सदरची तरतुद इतर विभागाना देणे सोयीस्कर होईल. बहूतांश आहरण व संवितरण (D. D. O.)अधिका-याकडून वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी शेवटच्याक्षणी अखर्चित तरतुद समर्पित करण्यात येते. अशी समर्पित केलेली तरतुद इतर कार्यालयाना वितरीत करता येत नसल्याने सदरची तरतुद व्यपगत होते. तरी दिलेल्या विहित कालावधीतच खर्च न होणारी तरतूद लेखी स्वरुपात समर्पित करण्यात यावी.

३. वित विभाग शासन परिपत्रक क्. संकीर्ण १०००/ प्र. क.१४ / कोषा -४ दि. ११ फेब्रूवारी २००० अन्वये १५ फेबूवारी किंवा त्यानंतर प्रशासकीय विभागांनी यंत्रसामुग्री, उपकरणे, नवीन मोटार वाहने, नवीन फर्निचर, नवीन झेरॉक्स मशीन, नवीन संगणक, अथवा त्याचे सुटे भाग यांच्या खरेदीच्या प्रस्तावाना मंजूरी देवू नये.

असे निदेश दिलेले आहेत. सदरचे निर्देश विचारात घेता खरेदीचे प्रस्ताव मान्यतेस्ताव शासनास दि.१ फेबुवारी पूर्वी सादर करण्याबाबत शासनस्त्रावरुन दि.२/१/२०१६ च्या शासन पत्रान्व्ये सुचित करण्यात आलेले आहे. तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाचे खरेदीस मान्यतेबाबतचे प्रस्ताव संचालनालयास **दि.२५ जानेवारी २०१६** पर्यत सादर करण्यात यावेत.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च् शिक्षण)
महाराष्ट्र राज्य् पुणे -१

प्रत

१. सहाय्यक संचालक (उच्च् शिक्षण) लेखा-१ शाखा,
२. प्रशासन अधिकारी प्रशा -३ शाखा यांना महितीस्त्व
३. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च् शिक्षण) यांनी आपल्या विभागातील कार्यालये, संस्था, वसतिगृहे यांना कळविण्यात यावे.
४. मा. प्रधान सचिव, उच्च् व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्त्व सविनय सादर